सकाळ | पुणे
बुधवार । १३ ऑगस्ट । २००८
TODAY

## अपयशाने खचून जाऊ नका : प्रा. विजय नवले

मांजरी, ता. १२ : अपयशाने खचून न जाता त्या अनुभवाकडे जो संधी म्हणून पाहतो तो जीवनात यशस्वी होतो. अशा विद्यार्थ्यांनी यश मिळविलेल्या व्यक्तींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवावा, असे मत करिअर मार्गदर्शक प्रा. विजय नवले यांनी व्यक्त केले.

अभियांत्रिकीच्या प्रथम वर्षात अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मानसिक उभारी देण्यासाठी येथील अण्णासाहेब आवटे अभियांत्रिकी महाविद्यालयात विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. नवले बोलत होते. 'अपयशातून यशाकडे' हे शब्द मानसिक सामर्थ्य वाढविणारे आहेत, असे प्रा. नवले यांनी सांगितले. सागर धुमाळने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.